# डॉ.सुरेश तायडे यांची मू.जे.तील कला विद्या शाखेच्या उपप्राचार्य पदी निवड

**जळगाव-२१/०९/२०१७**

जळगाव शहरातील मूळजी जेठा महाविद्यालयाच्या **कला विद्या शाखेच्या उपप्राचार्य पदावर** हिंदी विभाग प्रमुख डॉ.**सुरेश नामदेव तायडे निवड करण्यात** आली. नवनियुक्त उपप्राचार्य डॉ. सुरेश तायडे यांचे के.सी.ई.सोसायटीचे संस्थेचे **अध्यक्ष श्री.नंदकुमार बेंडाळे यांनी अभिंनदन** केले.

त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.उदय कुलकणी** यांनी डॉ. सुरेश तायडे **यांना महाविद्यालयीन परंपरेप्रमाणे उपप्राचार्यांच्या कुर्सीवर बसविले.** तसेच आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना ते म्हणाले की, डॉ.तायडे यांनी ५ वर्षे कला शाखेच्या समन्वयक पदावर यशस्वीरित्या कार्य केलेले आहे. तांच्या प्रशासन विषयक अनुभवांचा महाविद्यादयालयातील कामकाजाला निश्चितच लाभ होईल. कला शाखेतील विद्यार्थ्यांची प्रगती होण्यास मदत होईल. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी देखील डॉ.तायडे यांना नूतन कारकिर्दीकरिता शुभेच्छा दिल्यात. यावेळेस वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ.ए.पी.सरोदे, विज्ञान शाखेचे समन्वयक डॉ.जे.एन.चौधरी, कला शाखेच्या समन्वयिका डॉ.प्रज्ञा जंगले, ज्ञानज्योत स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक डॉ.जी.सी.कुलकर्णी, प्रा.चारुता गोखले, डॉ.चंद्रमणी लभाने, डॉ.विद्या पाटील, प्रा.विजय लोहार, प्रा.मनोज महाजन, श्री.सुभाष तळेले व कला शाखेतील प्राध्यापक उपस्थित होते.